# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**( विद्या विभाग )**

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३

गोविग/विद्या/क/१२९/२०२१ — दि. ०८/०४/२०२१

**प्रति,**

**मा.प्राचार्य,**
**विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित महाविद्यालये/ पदव्युत्तर शैक्षणिक विभागप्रमुख,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय:– विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या तक्रारीचे निराकरण करण्याबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सर्व अनुदानित महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज विहीत मुदतीत महाविद्यालयांकडून पाठविले जात नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून मुकावे लागण्याच्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त होत आहे. त्याच अनुषंगाने विद्यापीठाला शासन स्तरावर वेळोवेळी विचारणा होत आहे. शिष्यवृत्तीचे अर्ज वेळेत सादर न केल्याने शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचीत राहणे ही अतिशय गंभीर बाब असून विद्यापीठाचे मा.कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी यांच्या आदेशानुसार यावर वेळीच उपाय करणे गरजेचे असल्याने नमुद करून या गंभीर विषयावर तोडगा काढण्याकरिता सर्व अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व पदव्युत्तर शैक्षणिक विभागप्रमुख यांची दिनांक ०९/०४/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता आभासी पध्दतीने (webex meet app) सभा आयोजित करण्यात येत आहे.

सदर सभेला मा.कुलगुरू मार्गदर्शन करणार असून सर्व संबंधित प्राचार्यांनी सभेत उपस्थित राहणे बंधनकारक आहे. जे प्राचार्य अनुपस्थितीत राहतील व त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीबाबत काही तक्रारींचे निराकरण न झाल्यास संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

**(टिप:– बैठकीची लिंक १ तासापूर्वी सर्व प्राचार्यांना वितरीत करण्यात येईल.)**

मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये.

8/4/2021

(डॉ.ए.झेड.चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली